




सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on








E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ११ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


# हिमाचल प्रदेशात पावसाचं तांडव...! १५५ जणांचा मृत्यू

## २५० हून अधिक रस्ते बंद; ८३५२ कोटींचं नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ मंडी हिमाचल प्रदेश –** सध्या हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. राज्यातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. स्टेट इमर्जन्सी ऑपरेशन्स सेंटरच्या ताज्या रिपोर्टनुसार, राज्यात पूर, भूस्खलन आणि रस्ते अपघातांच्या घटनांमध्ये आतापर्यंत तब्बल १५५ जणांना मृत्यू झाला आहे. याशिवाय, २५९ मुख्य रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. तर २५५ ट्रान्सफॉर्मर्स ठप्प झाल्याने अनेक भाग आंधारात गेले आहेत.

पावसामुळे झालेल्या भूस्खलनाचा सर्वाधिक फटका मंडी जिल्याला बसला आहे. एकट्या मंडी जिल्यात ८८ रस्ते बंद पडले आहेत. याशिवाय, कुल्लूलाही पावसाचा मोठा फटका बसला आहे. येथील ३९ आणि शिमल्यातील १३ रस्त्यांवरील वाहतूकही पूर्णपणे ठप्प झाली आहे.दरम्यान, एकूण १५५ मृतांपैकी ६८ जणांचा मृत्यू भूस्खलन, अचानक आलेला पूर, झाडे व दगड कोसळणे आणि बुडण्यासारख्या नैसर्गिक घटनांमुळे झाला. तर, पावसादरम्यान झालेल्या रस्ते अपघातात ८७ जणांनी मृत्यू



झाला आहे. महत्वाचे म्हणजे, मंडीमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे सर्वाधिक १४ जणांचा मृत्यू झाला. चंबामध्ये रस्ते अपघातात १५ जणांचा मृत्यू झाल्याचे समजते.

### ८३५२ कोटी रुपयांचे नुकसान

या मुळसळधार पावसामुळे राज्यातील पायाभूत सुविधा, शेती आणि खासगी मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हा आकडा तब्बल ८३५२.६२ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. सर्वाधिक नुकसान सार्वजनिक बांधकाम विभागाचे झाले आहे. या विभागाला तब्बल ६१५.८५ कोटी रुपयांचा फटका बसला आहे. तर जलशक्ती विभागाचेही सुमारे १९९.८६ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.दरम्यान, राज्यात २१३ घरे पूर्णपणे तर ६२० घरे काही प्रमाणावर उद्धवस्त झाली आहेत. तर २०० जनावरांचा मृत्यू झाला असून प्रशासनाकडून युद्धपातळीवर रस्ते, वीज आणि पाणी पुरवठा पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

# आधी वंदे मातरम, मग जन-गण-मन!

## संपूर्ण देशात नियम लागू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नवी दिल्ली–** राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'चा अवमान करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे.संसदेने गेल्या महिन्यात 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करणारे हे महत्त्वपूर्ण विधेयक बहुमताने मंजूर केले होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असून संपूर्ण देशात हा नियम लागू झाला आहे.




केंद्र सरकारने राष्ट्रगीत 'जन गण मन' आणि राष्ट्रगीत 'वंदे मातरम' संदर्भात सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांना नवीन निर्देश जारी केले आहेत. मंत्रालयाने म्हटले आहे की, कोणत्या कार्यक्रमांमध्ये दोन्ही गीते गायली किंवा वाजवली जाणे आवश्यक आहे, हे नियमांमध्ये आधीच नमूद केलेले आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, एकाच कार्यक्रमात प्रथम 'वंदे मातरम' आणि त्यानंतर 'जन गण मन' वाजवले जाईल. ज्या राज्यांचे स्वतःचे राज्यगीत आहे, ती राज्ये देखील याच क्रमाचे पालन करतील. ९ जुलै रोजी सर्व राज्ये आणि मंत्रालयांना एक पत्र पाठवण्यात आले होते, ज्याचा तपशील प्रसिद्ध करण्यात आला. राष्ट्रगीत आणि राष्ट्रगीत नेहमी त्यांच्या मूळ शब्दांनुसार, अचूक उच्चारानुसार आणि स्थापित नियमांनुसार गायले व वाजवले जातील याची खात्री करण्याचे निर्देश सर्व राज्यांना देण्यात आले आहेत. दोन्हीच्या अधिकृत प्रती मंत्रालयाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आल्या आहेत.

# धर्मेंद्र प्रधान राहुल गांधींना म्हणाले, हे तर फक्त मगरीचे अश्रू

## झारखंड आंदोलनावर विचारला परखड सवाल!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ नवी दिल्ली–** विद्यार्थी आंदोलन आणि संसदेच्या दोन्ही सभागृहातील कोंडीवरुन माजी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काँग्रेस आणि राहुल गांधींवर टीका केली आहे. राहुल गांधींना ना संसदेत यायचे आहे, ना उत्तर ऐकायचे आहे. केवळ खोटं पसरवून मगरीचे अश्रू ढाळणे, एवढाच त्यांचा एकमेव हेतू आहे, अशी टीका प्रधान यांनी केली आहे. प्रधान यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याचा देखील उल्लेख केला आहे.

काँग्रेस विद्यार्थ्यांच्या हिताच्या मुद्द्यांवर खोटं पसरवत असल्याचा आरोप प्रधान यांनी पोस्टमधून केला आहे. विद्यार्थ्यांच्या हिताच्या मुद्द्यांवर काँग्रेस सातत्याने असत्य पसरवत आहे. राहुल गांधी यांच्याकडे कोणतेही तथ्य नाही. सवय म्हणूनच खोटे बोलणाऱ्या विरोधी पक्षनेत्याला ना संसदेत यायचे आहे, ना उत्तर ऐकायचे आहे. केवळ आपले खोटे पसरवून मगरीचे अश्रू ढाळणे, एवढाच त्यांचा एकमेव हेतू आहे, असे प्रधान यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.




गृहमंत्री अमित शाहांवर निरर्थक व खोटे आरोप करणे, हे राहुल गांधी आणि काँग्रेसची राजकीय हताशा दर्शवते, असे प्रधान यांनी म्हटले आहे. सरकार प्रत्येक मुद्द्यावर संसदेत चर्चा करण्यास तयार आहे. पण, काँग्रेस लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसदेचे कामकाज बाधित करून देश आणि तरुणांच्या हितांची पायमल्ली करत आहे. कारण देशाचे हित साधण्याऐवजी स्वतःचे हित जपण्यालाच त्यांचे प्राधान्य आहे. सभागृहात चर्चा सुरू असते, तेव्हा हे लोक बाहेर गोंधळ घालतात, कारण सभागृहात उत्तर ऐकण्याची धमक त्यांच्यात नाही, अशी टीका प्रधान यांनी केली.

प्रधान यांनी काँग्रेसची सिलेक्टिव्ह लोकशाही असल्याची टीका केली. स्वतःचे सरकार आहे, तिथे तरुणांवर हिंसाचार आणि जिथे राजकीय पोळी भाजायची आहे, तिथे खोटे बोलणे आणि गोंधळ घालत आहेत. झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेला हल्ला संपूर्ण देशाने पाहिला आहे. पण प्रश्न असा आहे की, प्रत्येक मुद्द्यावर पत्रकार परिषद घेणारे राहुल गांधी आज गप्प का आहेत? देशातील तरुण काँग्रेसचा हा दुटप्पीपणा ओळखतात. लोकशाहीत हुकूमशाहीला कोणतेही स्थान नाही, हे राहुल गांधी आणि आणीबाणीच्या मानसिकतेने चालणाऱ्या काँग्रेस पक्षाने नीट समजून घेतले पाहिजे, असे प्रधान म्हणाले आहेत.

# कारवाईच्या नावाने तमाशा?

## चांदूरबाजारात RTO चा स्कूलबसचा भरधाव पाठलाग, ; नागरिकांचा संतप्त सवाल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११ चांदूरबाजार :** सात वर्षीय ईश्वरी ठाकरेच्या दुर्दैवी मृत्यूनंतर स्कूलबसच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना, ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी चांदूरबाजार शहरात ठढज पथकाने स्कूलबसचा केलेला पाठलाग चर्चेचा विषय ठरला. विशेष म्हणजे, पाठलाग करूनही कोणत्याही स्कूलबसवर दंडात्मक अथवा कायदेशीर कारवाई झाली नसल्याने नागरिकांनी ठढजच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.सायंकाळी सुमारे ५ वाजता ठढजचे स्कॉर्पिओ वाहन क्रमांक चक-०४-ङढ-६७२७ शहरात दाखल होताच काही स्कूलबस चालकांमध्ये खळबळ उडाली. ठढज पथकाने एका पिवळ्या स्कूलबसचा पाठलाग केला. चालकाने बस सोनार लाईन परिसरातील गर्दीच्या ठिकाणी नेऊन थांबवली. त्यानंतर नगरपरिषद रस्ता-बेलोरा चौक मार्गावर दुसऱ्या स्कूलबसचा पाठलाग करण्यात आला. संबंधित चालकाने बस थेट डढ डेपोच्या वर्कशॉपमध्ये नेऊन लपवल्याचे सांगण्यात येत आहे.मात्र, एवढा पाठलाग करूनही एकाही वाहनावर कारवाई न झाल्याने 'ही कारवाई की केवळ दिखावा?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, शाळा सुटण्याची वेळ असल्याने शहरातील रस्त्यांवर मोठ्या संख्येने विद्यार्थी व नागरिकांची वर्दळ होती. अशा परिस्थितीत भरधाव वाहनांचा पाठलाग केल्याने मोठा अपघात घडला असता तर त्याची जबाबदारी कोणाची, असा संतप्त प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला.गेल्या काही दिवसांपासून ठढजकडून स्कूलबसवर तपासणी व कारवाई केली जात असली, तरी विना नंबरची जड वाहने, ठढज पासिंग नसलेली वाहने तसेच अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई कधी होणार? असा सवालही आता उपस्थित होत आहे.दरम्यान, स्कूलबसचा भरधाव पाठलाग करण्याऐवजी शाळा सुटण्याच्या वेळेत प्रमुख मार्गांवर तपासणी नाके उभारून वाहनांची कागदपत्रे, चालकांची पात्रता व सुरक्षा नियम तपासावेत आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. 'कारवाई करा, मात्र विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होईल अशा पद्धतीने वाहनांचा पाठलाग करू नका,' अशी भूमिका नागरिकांनी व्यक्त केली आहे.




# सरकार मनोज जरांगेंना का घाबरतेय?

## एक दिवस उपोषणाला बसले की मंत्री धावतात; म्हणूनच हिंमत वाढली – विजय वडेट्टीवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ नागपूर–** मनोज जरांगे यांना राज्य सरकार नक्की का घाबरत आहे? ते उपोषणाला बसले की सरकारचे मंत्री त्यांच्यापुढे पायघड्या घालतात, त्यामुळेच त्यांची हिंमत वाढली आहे, असे म्हणत मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकारवर टीका केली आहे.



विजय वडेट्टीवार म्हणाले की, मुख्यमंत्र्यांना किंवा इतर कोणत्याही घटकाला लक्ष्य केले जात असताना सरकार म्हणून राज्याची भूमिका ठोस असायला हवी. मात्र, मनोज जरांगे एक दिवस उपोषणाला बसले की सरकारमधील चार-चार मंत्री आणि आमदार तातडीने चर्चेसाठी धाव घेतात. सरकारने सुरुवातीलाच मंत्री आणि आमदार पाठवून त्यांच्यापुढे पायघड्या घातल्या नसत्या, तर त्यांची हिंमत वाढली नसती. आता सरकारनेच ही हिंमत वाढवल्यामुळे त्याचे परिणाम सरकारला भोगावे लागत आहेत.ओबीसी नेत्यांवरील टीकेचा समाचार घेताना वडेट्टीवार म्हणाले की, आम्हाला कोणी अशा पद्धतीने घाबरवू शकत नाही, आम्ही सोडणार नाही. सरकारविरोधात भूमिका घ्यायची असेल, तर ती जरूर घ्यावी; मात्र सरकारमधील असोत वा बाहेरील, ओबीसी नेत्यांना वैयक्तिक पातळीवर लक्ष्य करणे पूर्णपणे चुकीचे आहे. आता हे प्रकार सहन करण्यापलीकडचे झाले असून सरकारने अशा लोकांचा वेळीच बंदोबस्त केला पाहिजे.

# आता यांची बोबडी बंद का?

## रांचीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून शेलारांचा ठाकरे बंधूंना सवाल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.११मुंबई–** विद्यार्थ्यांच्या मुद्द्यांवरून दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला यश मिळाल्यानंतर आता अनेक राज्यांमध्ये, जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी आपल्या मागण्या घेऊन आंदोलन करत आहेत. झारखंड राज्यातील रांचीमध्ये सुद्धा जेपीएससी आणि जेएसएससी परीक्षांमधील कथित पेपरफुटी व गैरव्यवहारांविरोधात विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. गेल्या आठवड्याभरापासून झारखंडमध्ये विद्यार्थी आंदोलन करत असून सोमवारी (१० ऑगस्ट) विद्यार्थ्यांनी विधानसभेला घेराव घालण्यासाठी मोर्चा काढला. ज्यानंतर आंदोलक विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. विद्यार्थी ऐकत नसल्याचे पाहता पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज, पाण्याचा मारा (वॉटर कॅनन) आणि अश्रुधुराचा वापर केला. ज्याचे पडसाद आता देशभरात उमटायला सुरुवात झाले आहेत. ज्यानंतर याच मुद्द्यावरून आता भाजप नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनी विरोधकांवर आणि विशेषतः ठाकरे बंधूंवर निशाणा साधला आहे.

रांचीमध्ये विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनी लाठीहल्ला केला. या ठिकाणी झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस आघाडीचे सरकार आहे. ज्यामुळे या हल्ल्यावरून काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका सुरू आहे. तर, याच मुद्द्यावरून



बोलताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, काल रांचीमध्ये आमचे विद्यार्थी आंदोलन शांतपणे करत होते. नोकर भरतीमध्ये पारदर्शकता असावी यासाठी हे तरुण आंदोलन करत होते. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला केला आहे. शत्रू समजून विद्यार्थ्यांना बडवले आहे. हे अतिशय अमानुष आणि क्रूर आहे. सरकार कुणाचे आहे तर काँग्रेसचे सरकार आहे. या आंदोलनात बळाचा वापर का केला. राहुल गांधी हे तुमचे सरकार आहे. महिलांवर हल्ला करण्याचे आदेश कोणी दिले, असा सवाल शेलार यांनी विचारला.



# गडचिरोलीत सर्पदंशाने ३ विद्यार्थिनींचा मृत्यू

## मुख्यमंत्र्यांचे आश्रमशाळेचा परवाना रद्द करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ गडचिरिली**

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाईत येथील आश्रमशाळेत एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. रात्री झोपेत असताना सापाने दंश केल्याने तीन विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, एका विद्यार्थिनीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, आश्रमशाळा प्रशासनावर कठोर कारवाई करण्याची तीव्र मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आश्रमशाळेचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याचे सक्त निर्देश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित आश्रमशाळा ही काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, तीन वेळा आमदार आणि एकदा खासदार राहिलेले मारोतराव कोवासे यांची आहे.

एवढे अनुभवी नेते जर अशा बेजबाबदार पद्धतीने आश्रमशाळा चालवून लहान मुलींच्या सुरक्षेशी खेळत असतील, तर त्यांना माफी कशी द्यावी, असा संतप्त सवाल उपस्थित करत आदिवासी समाजातील मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत या घटनेवर अत्यंत कठोर आणि संतप्त भूमिका मांडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर बोलताना म्हटले की, संबंधित शाळेत शिक्षक नसेल, वॉर्ड नसेल, शासकीय अनुदान घेत असतानाही सुविधा दिली जात नसेल तर या आश्रमशाळेची ज्या अधिकाऱ्याने तपासणी केली आणि अहवाल दिला, त्याला निलंबित करा, असे आदेश दिले आहेत. तसेच रस्त्यावरच्या आश्रमशाळांची केवळ पाहणी करू नका, अंतर्गत भागातील आश्रमशाळांची सुद्धा नियमित तपासणी करा. आश्रमशाळेचा परवाना कायमस्वरूपी रद्द करा, असेही निर्देश फडणवीसांनी दिले आहेत. याचसोबत मुख्य सचिवांनी एक बैठक घेऊन सर्वंकष तपासणीची यंत्रणा उभी करावी. सर्व विभागांना त्यात समाविष्ट करा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

### मुख्याध्यापक आणि अधीक्षकांवर फौजदारी गुन्हे दाखल

गडचिरोली येथील एका खासगी आश्रमशाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर प्रशासनाने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. या घटनेची पाहणी केल्यानंतर हा केवळ अपघात नसून संस्थाचालक आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी संबंधित संस्थाचालक, गायब असलेले मुख्याध्यापक आणि अधीक्षकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती आशिष जयस्वाल यांनी माध्यमांशी बोलताना दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर जयस्वाल यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि पीडित कुटुंबांचे सांत्वन केले.

## संपादकीय ......

# दोन राष्ट्रवादींचे काय होणार ?

*सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाच्या मुद्द्यावरून मतभेद झाल्यानंतर काँग्रेससोबत फारकत झाल्यावर शरद पवार यांनी १९९९ साली स्वत:चा राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष स्थापन केला. पवारांनी सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाचा फटका काँग्रेसला बसेल अशी शंका व्यक्त करण्यामागे त्यांचे वैयक्तिक कारणही होते. कारण पवार हे पंतप्रधानपदाची महत्वाकांक्षा बाळगणारे नेते होते. अर्थात, आताही संधी मिळाली तरी ते संधी सोडणार नाहीत. कारण कुणाच्या नशिबात काय लिहिले आहे हे कळत नाही, म्हणूनच तज्ज्ञांचे अंदाज चुकतात. कारण तज्ज्ञ समोर दिसणारी आकडेवारी पाहत असतात, मागे घडलेल्या घटनांशी साम्य जुळवून पाहत असतात, पण अदृश्य घटक असतात, ते दिसत नाहीत. ते अदृश्य घटकच महत्वाची भूमिका पार पाडून डाव फिरवत असतात.*

*जसे पी.व्ही. नरसिंह राव यांना आपण पंतप्रधान बनू असे वाटलेही नव्हते, पण ते झाले. ज्या शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली त्यांच्या डोळ्यासमोरच त्यांच्या पक्षाची जी अवस्था झाली आहे, तसेच सध्या ज्या काही हालचाली चालू आहेत, त्यावरून या पक्षाची पुढे काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. पवार आणि ठाकरे ही महाराष्ट्रातील दोन प्रबळ राजकीय घराणी. राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर शिवसेनेमध्ये उभी फूट पडली. तसे आपल्या पक्षांमध्ये होऊ नये, यासाठी शरद पवारांनी काळजी घेतली. आपले पुतणे अजित पवार यांना राज्यातील जबाबदारी दिली तर आपली मुलगी सुप्रिया सुळे यांना खासदार म्हणून संसदेत पाठवले. त्यामुळे या दोघांमध्ये थेट संघर्ष होणार नाही, असा पवारांचा अंदाज होता. पण तरीही जेव्हा सुप्रिया सुळे यांना पवारांनी राजकारणात सक्रिय केले, तेव्हा शरद पवारांचा खरा वारसदार कोण, असा प्रश्न अधूनमधून विचारण्यात येऊ लागला. त्याचा निर्णय लोक घेतील, असे उत्तर दिले जात असे.*

*शरद पवार यांचे दिवंगत पुतणे अजित पवार हे काकांच्या छत्रछायेखाली राजकारणात मोठे झाले. आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. पण त्यांना उपमुख्यमंत्रीपदाच्या पुढे मजल मारता येत नव्हती. गाडी तिथेच येऊन अडकत होती. त्यामुळे ते प्रचंड नाराज होते. काकांनी जर राज्यातील पक्षाची सगळी सूत्रे आपल्या हातात दिली तर आपण सहज मुख्यमंत्री होऊ, असे अजितदादांना वाटत होते. पण काका तसे करत नाहीत, त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याचे आपले स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असे अजित पवारांना वाटत होते. त्यामुळेच मग त्यांनी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या सत्ताधारी महायुतीत येण्याचा निर्णय घेतला, त्यांनी घेतलेला हा निर्णय वैफल्यातून होता. कारण त्यांना मुख्यमंत्री करण्याचे कुठलेच वचन महायुतीने दिले नव्हते.*

*अजित पवार यांनी २०१९ साली राजभवनावर फडणवीसांसोबत सकाळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन जे पहिले बंड केले ते शरद पवारांनी मोडून काढले, पण २०२३ ला जे बंड केले, ते मात्र शरद पवारांना मोडून काढता आले नाही, कारण यावेळी बहुसंख्येच्या आधारावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच अजित पवारांनी हायजॅक केला होता. त्यासाठी भाजपने त्यांना मोठी मदत केली होती, जशी त्यांनी त्याआधी एकनाथ शिंदे यांना केली होती. अजित पवार बाहेर पडल्यावर त्यांनी ज्या शब्दात आपली नाराजी व्यक्त केली, शरद पवारांच्या वयोवृद्धपणाचा उल्लेख केला त्यावरून पवारांच्या बाजूला असलेली मंडळी फार नाराज झाली होती. अजित पवार आणि सुप्रिया सुळे असे दोन गट त्यावेळी एकमेकांच्या समोर आले. अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यात ज्या संघर्षाची कुणी कल्पनाही केली नव्हती, असा संघर्ष झाला. अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आपल्या ताब्यात घेतल्यानंतर शरद पवारांसोबत राहलेल्या मंडळींना वेगळे चिन्ह आणि नाव मिळाले. कायदेशीररित्या मूळ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांकडे गेली. शरद पवारांसारख्या राजकारणातील मातब्बर नेत्यांसाठी हा मोठा धक्का होता. पण परिस्थिती पुढे ते काहीच करू शकत नव्हते.*

*आपली महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपण जोमाने कामाला लागायला हवे, असा अजित पवार यांचा प्रयत्न होता. अजित पवार भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेसोबत होते. पण या दोघांची विचारसरणी त्यांच्याशी तशी जुळणारी नव्हती. म्हणजे जे उद्धव ठाकरे यांचे काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत होत आहे, तशीच परिस्थिती होत होती. त्यामुळे पुन्हा आपण शरद पवारांसोबत जावे, असे अजित पवार यांना वाटत असावे. असे संकेत त्यांच्या हालचालींवरून दिसत होते. पण या वर्षाच्या सुरुवातीला अचानक त्यांचे विमान अपघातात निधन झाले. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण होण्यासंबंधीच्या गोष्टी अनिर्णीत राहिल्या. त्यानंतर महायुतीकडून सुनेत्रा पवार यांना अजित पवारांचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले.*

*फडणवीस आणि शिंदे यांच्यासोबत सत्तेत अजित पवार असले तरी ते दोघे अजित पवारांपासून सुरक्षित अंतर ठेवून होते. कारण फडणवीस आणि शिंदे यांचे सरकार स्थिर होते. त्यामुळे त्यांना अजित पवारांची तशी गरज नव्हती. आता तर अजित पवार हयात नाहीत. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्यासाठी परिस्थिती अधिक आव्हानात्मक आहे. त्यात पुन्हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत तटकरे, पटेल यांचा कल वेगळा दिसत आहे. याच वेळी शरद पवार आणि सुप्रिया सुळे दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भेटी घेताना दिसत आहेत. महाराष्ट्राच्या हिताच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आम्ही मोदींना भेटतो, असे सुप्रिया सुळे म्हणत असल्या तरी ये जो पब्लिक है, ये सब जानती हैं, असेच म्हणावेसे वाटते. काँग्रेसला आव्हान देऊन पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती, पण आज त्या पक्षाचे पुढे काय होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.*

# शहरात जड मालवाहू वाहन बंदीचे नवे मार्ग व वेळापत्रक

## स. ६.३० ते रात्री ९.३० वा. पर्यंत प्रमुख मार्गावर नो-एंट्री

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११ अमरावती**

शहरात वाढती लोकसंख्या, वाहनांची मोठी वर्दळ आणि त्यामुळे होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने शहरातील प्रमुख मार्गावर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी घालण्याबाबतची प्रस्तावित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१ चेकलम (१) (ब) आणि मोटर वाहन कायदा १९८८ च्या कलम ११५ अन्वये मिळालेल्या अधिकारांनुसार हे प्रस्तावित आदेश पारित केले आहेत.शहरात सन २०२४ ते जुलै २०२६ या काळात एकूण १,१०८ अपघात

**अत्यावश्यक सेवा, अन्नधान्य व कृषी माल वाहतुकीला सूट**

**नियोजित वेळेची अट, नियमाचे उल्लंघण केल्यास कारवाई**

**पोलीस प्रशासनाची प्रस्तावित अधिसूचना जारी**

झाले आहेत. यातील २१२ प्राणघातक अपघातांमध्ये २४६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून ९१३ व्यक्ती गंभीर व किरकोळ जखमी झाल्या आहेत. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठीहानिर्णय घेण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आले आहे.तरदररोज सकाळी ६.३० ते




रात्री ९.३० वाजेपर्यंत वाहनांना शहरात प्रतिबंध असणार आहे.यावेळेत शहरातील जे मार्ग बंद राहतील यामध्ये मुख्य चौक व बायपास मार्ग : गौरी इन वा पॉइंट, वेलकम टी पॉइंट, पंचवटी, इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गद्रे चौक, नवाथे चौक, बेनाम चौक, अलमास गेट, बडनेरा ते यवतमाळ वाय पॉइंट यांचा समावेश असेल. तसेच नाका व अंतर्गत मार्गांमध्ये राजुरा नाका, विद्यापीठ चौक, बियाणी चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, इर्विन चौक, दीपक चौक, चित्रा चौक, टांगा पढाव, नागपुरी गेट चौक ते ट्रान्सपोर्ट नगर व भातकुली जकात नाक्यापर्यंत या मार्गांचा समावेश आहे.तर कायमस्वरूपी बंद राहणाऱ्या मार्गांमध्ये गांधी चौक ते रविनगर, गांधी चौक ते राजापेठ आणि गांधी चौक ते अंबापेठ मार्ग. तसेच बजरंग टेकडी ते विलासनगर, पटवा चौक, मोरबाग, मसानगंज. गर्ल्स हायस्कूल चौक ते इर्विन चौक. शहरातील परकोटाच्या आतील दाट लोकवस्तीतील सर्व अंतर्गत मार्गाचा समावेश आहे.

# पीकविम्याकडे ४१ हजार शेतकऱ्यांची पाठ

## टक्का घसरल्याने योजनेच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह




| | |
|---|---|
| स्थिती सहभागी शेतकरी | ५७, २७१ |
| शेतकरी हिस्सा (प्रीमियम) | ९.९१ कोटी |
| राज्य सरकारचा हिस्सा | १.८८ कोटी |
| केंद्र सरकारचा हिस्सा | १.८८ कोटी |
| एकूण प्रीमियम जमा | १३.६८ कोटी |
| विमा संरक्षित क्षेत्र | ८९, ३९० हेक्टर |

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील परताव्याचे निकष बदलल्याने या योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या घटू लागली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा या योजनेतील ४१ हजार ३५२ शेतकऱ्यांनी सहभागच घेतलेला नाही. वर्ष २०२५ च्या खरीप हंगामात ९८ हजार ६२३ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. दरवर्षी या योजनेतील सहभागीतांचा टक्का घटू लागल्याने या योजनेच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह लागू लागले आहे. जिल्ह्यातील सहा लाख ३८ हजार पेरणी झालेल्या क्षेत्रापैकी ८९ हजार ३९० हेक्टर क्षेत्र खरीप हंगामात विमा संरक्षित झाले आहे. गेल्या वर्षापासून केंद्र पुरस्कृत पीकविमा योजनेचे निकष बदलण्यात आले आहेत. पीक कापणी प्रयोगावर आधारित उंबरठा उत्पादन नुकसान भरपाईसाठी गृहीत धरण्यात येत आहे. या उत्पादनाची सरासरी दोन टप्प्यांवर काढण्यात येत असल्याने नुकसानभरपाईची फार कमी रक्कम शेतकऱ्यांच्या पदरी पडत आहे. गत हंगामात शेतकऱ्यांनी घेतलेल्या अनुभवामुळे यंदा शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरविण्यास सुरवात केली आहे. चालू वर्षातील खरीप हंगामात आतापर्यंत ९३ टक्के क्षेत्रात पेरण्या झाल्या आहेत. 'एल निनो'च्या प्रभावाने यंदा उत्पादनाची सरासरी घटण्याचा अंदाज कृषी तज्ज्ञांनी वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर यंदा विमा योजनेत अधिक शेतकऱ्यांचा सहभाग राहील, हा अंदाज मात्र आता चुकला आहे. पीकविमा काढण्याची मुदत १० ऑगस्टला संपली, त्यावेळी जिल्ह्यातील ५७ हजार २७१ शेतकऱ्यांचा या योजनेत सहभाग दिसून आला. जिल्ह्यात सरासरी सहा लाख ८२ हजार ९९२ हेक्टर पेरणी क्षेत्र असून सहा लाख ३८ हजार १३४ हेक्टरमध्ये पेरण्या झाल्या आहेत. विमा संरक्षित क्षेत्र मात्र ८९ हजार ३९० हेक्टर इतकेच झाले आहे.

# वरुड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा - शेतकरी व ग्रामस्थांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११वरुड**

चालू पावसाळ्यात वरुड तालुक्यात अपेक्षेच्या तुलनेत अत्यल्प पाऊस झाल्याने संपूर्ण तालुक्यावर जलसंकट आणि दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने नदी-नाले कोरडे पडले असून विहिरी, कूपनलिका व स्थानिक जलसाठ्यांची पाणीपातळी झपाट्याने खालावली आहे. या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन वरुड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने वरुड तालुक्यातील संत्रा, कापूस, सोयाबीन आणि तूर, या प्रमुख पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. विशेषतः तालुक्याचा मुख्य आधार असलेल्या संत्रा



**पिण्याचे पाणी व चाऱ्याचे संकट**

पावसाने दडी मारल्याने वरुड तालुक्यातील अनेक गावांमध्ये आतापासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. नदी-नाले आणि जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी झाल्याने आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची भीती आहे. त्याचबरोबर गुरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने पशुपालकही हवालदिल झाले आहेत.

पिकाचा 'मृग बहार' पाण्याअभावी धोक्यात आला आहे. पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने संत्र्याच्या झाडांची फळगळ सुरू झाली असून, अनेक ठिकाणी पिके करपण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसाच्या खंडामुळे भूजल पातळीही कमालीची खाली गेली आहे. आतापर्यंत केवळ २६० मिमी पावसाची नोंद झाली आहे. जून आणि जुलै महिन्यात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्यास पहिला ट्रिगर अथवा पहिली चेतावणी दिली जाते. यंदा ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्याने परिस्थितीचे गांभीर्य वाढले आहे.

# जिल्ह्यात अँटी-स्नेक व्हेनमचा २० हजारांवर साठा

## सर्पदंश झाल्यास रुग्णालयात जाण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती-**

पावसाळ्यात साप बिळाबाहेर येत असल्याने सर्पदंशाच्या घटनांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सर्पदंशावरील उपचारासाठी अँटी-स्नेक व्हेनमच्या २० हजारांहून अधिक व्हायल्सचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. अंधश्रद्धेला बळी न पडता सर्पदंश झाल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार घ्यावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच प्राथमिक आरोग्यकेंद्रांमध्ये सर्पदंशावरील उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे सर्पदंश झाल्यानंतर कोणताही विलंब न करता तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल होणे आवश्यक आहे. सर्पदंशानंतर झाडफूक, गंडेदोरे,




मांत्रिक किंवा इतर अंधश्रद्धाळू उपचारांवर विश्वास ठेवल्यास उपचारास विलंब होऊन रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे अशा अफवा आणि अंधश्रद्धेला बळी न पडता केवळ वैद्यकीय उपचारांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. पावसाळ्यात शेतात काम करताना गमबूट किंवा मजबूत पादत्राणे वापरणे, रात्री बाहेर पडताना टॉर्चचा वापर करणे, घर व परिसर स्वच्छ ठेवणे, गवताचे ढिगारे व अडगळ टाळणे तसेच साप आढळल्यास त्याला पकडण्याचा प्रयत्न न करता संबंधित यंत्रणेला माहिती देणे, अशी खबरदारी घेण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. जिल्ह्यात सध्या सर्पदंशावरील औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी घाबरून न जाता वेळेत उपचार घेतल्यास जीवितहानी टाळता येऊ शकते, असा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

**नागरिकांनी पावसाळ्यात सतर्क राहावे**

पावसाळ्यात साप बिळाबाहेर येत असल्याने सर्पदंशाच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी अधिक सतर्क राहावे. सर्पदंश झाल्यास अंधश्रद्धेला बळी न पडता तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी केले आहे.

# जखमी गोवंशाच्या सेवेत 'गौ संजीवनी' ॲम्ब्युलन्स

## स्व. प्रवीण व स्व. प्रणम मालू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भेट, 'वसा' संस्थेचा १५वा वर्धापन दिन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

शहरातील रस्त्यांवर अपघातात जखमी होणाऱ्या तसेच आजारी अवस्थेत बेवारस भटकणाऱ्या गोवंश व इतर मोठ्या प्राण्यांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी मालू परिवाराने 'वसा' संस्थेला अत्याधुनिक हायड्रॉलिक कॅटल (पशू) म्ब्युलन्स दान केली आहे. 'गौ संजीवनी', असे नामकरण करण्यात आलेल्या या म्ब्युलन्सचे लोकार्पण गोवर्धन पर्वत येथील श्री गोरक्षण व्हेटर्नरी हॉस्पिटल व वसा निमल रेस्क्यू सेंटरमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

स्व. प्रवीण मालू आणि स्व. प्रणम मालू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मालू एंटरप्रायझेसतर्फे ही म्ब्युलन्स 'वसा' संस्थेला देण्यात आली.



संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र गो-सेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी, वर्षा मालू, अलका मालू, वसा संस्थेचे सचिव गणेश अकर्ते, कोषाध्यक्ष भूषण सायंके आणि अध्यक्ष शुभमनाथ सायंके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात वर्षा मालू यांनी स्व. प्रवीण व स्व. प्रणम मालू यांच्या स्मृतींना उजाळा देत वसा संस्थेच्या प्राणीसेवेचे कौतुक केले. त्यानंतर अलका मालू व वर्षा मालू यांच्या हस्ते म्ब्युलन्सचे पूजन करून तिची चावी वसा संस्थेकडे सुपूर्द करण्यात आली. महाराष्ट्र गो-सेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी यांनी जखमी व आजारी जनावरांसाठी अशा अत्याधुनिक म्ब्युलन्सची गरज अधोरेखित केली. प्राणीसेवेचे कार्य अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यातही आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. प्रास्ताविकात सचिव गणेश अकर्ते यांनी वसा संस्थेच्या १५ वर्षांच्या सेवाकार्याचा आढावा घेतला. संस्थापक अध्यक्ष शुभमनाथ सायंके यांनी उद्योजक वरुण मालू, पुष्पा मालू, मालू परिवार तसेच संस्थेच्या नियमित देणगीदारांचे आभार मानून संस्थेच्या कार्याचा परिचय करून दिला. संचालन डॉ. सुमित वैद्य यांनी केले. आभार संपदा गडलिंग यांनी मानले. यशस्वीतेसाठी भूषण सायंके, आदेश सावरकर, राजेश्वर वंजारे, कांचन अंबुलकर, पंकज मालवे, धनंजय मालवे, आकाश वानखेडे, निवृत्ती गावंडे, रमेश तिरके, जोसेफ, महादेव, दीपक लकरा, रोहित रेवाळकर, रोशन इंगळे, अभय साखरकर, अंकुश ठाकरे, प्रज्ज्वल माकडे, सिद्धांत मते, आर्यन जवंजाळ आणि आदित्य रामटेके यांनी परिश्रम घेतले.

# कॉक्लिअर इम्प्लांटधारकांच्या साऊंड प्रोसेसरचा आजीवन खर्च शासनाने करावा

## श्रवणदोष निवारण कृती समितीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११अमरावती-** अमरावती जिल्ह्यातील श्रवणबाधित व्यक्तींच्या विविध मागण्यांसाठी श्रवणदोष निवारण कृती समिती आक्रमक झाली आहे.



कॉक्लिअर इम्प्लांट झालेल्या व्यक्तींच्या साऊंड प्रोसेसरचा आजीवन खर्च शासनाने करावा, अशी प्रमुख मागणी समितीच्या वतीने करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्याच्या धर्तीवर अमरावती जिल्ह्यातही श्रवणबाधित व्यक्तींसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून दरवर्षी किमान १५ लाख रुपयांचा निधी राखीव ठेवावा, अशी मागणी करण्यात आली.या निधीतून कॉक्लिअर इम्प्लांटच्या साऊंड प्रोसेसरची दुरुस्ती, बॅटरी, आवश्यक वैद्यकीय व श्रवणविषयक साधने तसेच गरजू श्रवणबाधित व्यक्तींना आवश्यकतेनुसार आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी समितीने केली आहे. यासंदर्भात श्रवणदोष निवारण कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निवेदन सादर करण्यात आले. शासनाने या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी विनंती यावेळी करण्यात आली

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# अमरावतीचा 'डिफेन्स कॉरिडोअर'मध्ये समावेश करा

## डॉ. अनिल बोंडे यांची संरक्षण मंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जिल्ह्याचा प्रस्तावित 'डिफेन्स कॉरिडोअर'मध्ये समावेश करावा आणि अमरावतीला संरक्षण उत्पादन हब म्हणून विकसित करावे, अशी मागणी भाजपाचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.



खासदार बोंडे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, अमरावतीचे भौगोलिक स्थान, रस्ते व रेल्वे कनेक्टिव्हिटी, उपलब्ध जमीन आणि कुशल मनुष्यबळ यामुळे हा परिसर संरक्षण उद्योगासाठी अत्यंत उपयुक्त आहे. अमरावतीत भारत डायनेमिक्स लिमिटेडचा प्रस्तावित मिसाईल निर्माण प्रकल्प लवकरात लवकर सुरू करावा तसेच बीडीएल, डीआरडीओ आणि एचएएल यांसारख्या मोठ्या कंपन्यांचे युनिट्स स्थापन करून 'डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर' तयार करावे, अशी मागणी त्यांनी केली. या प्रकल्पामुळे विदर्भातील हजारो तरुणांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार मिळेल आणि एमएसएमई उद्योगांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास डॉ. बोंडे यांनी व्यक्त केला. यासाठी संरक्षण मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चमूने अमरावतीचा दौरा करून पाहणी करावी, अशी विनंतीही त्यांनी केली.

# श्री अंबादेवी, श्री एकवीरा देवी मंदिरासाठी ४१० कोटींचा आराखडा

## नवरात्रोत्सवानंतर काम सुरू होण्याची शक्यता, एमएसआयडीसीने तयार केला आराखडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** श्री अंबादेवी, श्री एकवीरा देवी मंदिरासाठी ४१० कोटींचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला असून याबाबत शासनाकडून आर्किटेक्ट भिवगडे त्यांच्या सहकाऱ्यांसह मंदिर संस्थानात पोहोचले. दुपारी दोन तास भिवगडे यांची दोन्ही संस्थानांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. तसेच विकास आराखड्यात ज्या सुधारणा सुचवण्यात आल्या त्याच्याही नोंदी शासनाच्या वतीने घेण्यात आल्या.

विकास आराखड्याला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर श्री अंबादेवी व श्री एकवीरा देवी मंदिर परिसराचा नागपुरातील श्री कोरडी देवी अंबा महालक्ष्मी मंदिर परिसराप्रमाणे कायापालट होणार आहे. दोन्ही संस्थानाच्या पदाधिकाऱ्यांनी सुचवलेल्या सुधारणांशी भिवगडे यांनी सहमती दर्शवली. मार्च महिन्यापासून श्री अंबादेवी व श्री एकविरा देवी मंदिर विकास आराखडा प्रारूप चर्चेत आले आहे. राज्य शासनाच्या नियोजन विभागाने संपूर्ण परिसराचा आराखडा तयार केला असून गर्भगृहाला कोणताही धक्का न लावता, मंदिर, परिसराचे सौंदर्यीकरण, नुतनीकरण, भाविकांना जास्तीत जास्त आरामदायक सुविधा देण्याचा आराखड्यात प्रयत्न करण्यात आला आहे. या आराखड्याला लवकरच अंतिम मंजुरी मिळेल, असा विश्वास संस्थानांद्वारे व्यक्त करण्यात आला तसेच नवरात्रोत्सवानंतर नव्या विकास आराखड्यानुसार काम सुरू होईल, अशी शक्यताही वर्तवण्यात आली. कारण, जमिनीचे अधिग्रहण करण्याच्या कामाला सर्वप्रथम सुरुवात केली जाईल.



### प्रारूप आराखडा तयार झाला, त्यात दुरुस्त्याही सुचवल्या

श्री अंबादेवी, श्री एकवीरा देवी मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण, नुतनीकरणासाठी ४१० कोटींचा प्रारूप आराखडा तयार झाला असून त्यात दुरस्त्याही सुचवण्यात आल्या आहेत. एमएसआयडीसीचे आर्किटेक्ट, वास्तू अभियंत्यांनी दोन्ही मंदिरांची नुकतीच पाहणी केली. – डॉ. जयंत पांढरीकर, सचिव, श्री अंबादेवी संस्थान.

# १६ ला जि.प. शिक्षक बँकेची आमसभा

## १२ विषयांवर चर्चा, वादाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, १६ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजता होणार आहे. अमरावती येथील कठोरा चौक जकात नाका-रहाटगाव रिंग रोडवरील अंशुमन पॅलेस (श्रीनिवास कॉलनी) येथे ही सभा आयोजित करण्यात आली आहे. बँकेच्या आर्थिक आणि प्रशासकीय कामकाजाशी संबंधित १२ महत्त्वाच्या विषयांवर या सभेत चर्चा करून निर्णय घेतले जातील.

या सभेत सन २०२४-२५ च्या वार्षिक अहवालास आणि सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यावर विचार होईल. तसेच, लेखापरीक्षकांच्या अहवालावर चर्चा करून तो स्वीकारणे आणि मागील वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोष दुरुस्ती अहवालावर विचार करून स्वीकृती देणे हे विषयही अजेंड्यावर आहेत.

याशिवाय, सन २०२६-२७ करिता वैधानिक लेखापरीक्षकांसाठी नियुक्ती करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार बँकेच्या कामकाजाचा आढावा घेणे आणि सभासदांच्या प्रशिक्षणाबाबत विचारविनिमय




करणे हे मुद्देही सभेत मांडले जातील.

बँकेच्या कर्जावरील व्याजदर, लाभांश, विभागातील महसूल कर्मचाऱ्यांना सभासदत्व बहाल करणे, मुख्यालय इमारतीचे बांधकाम, बुलढाणा शाखा सुरू करणे, संचालक मंडळाची संख्या वाढवणे आणि उच्च शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करणे अशा विविध विषयांवर चर्चा करून ठराव मंजूर केले जातील. मुख्यालयाचे बांधकाम आणि महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना सभासदत्व देण्यावरून वाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सध्याच्या संचालक मंडळाची ही शेवटची आमसभा असल्याने तिला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या सभेकडे बँकेच्या सभासदांसह सहकारी क्षेत्रातील सर्वांचे लक्ष लागले आहे. संचालक मंडळाने सर्व सभासदांना या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी मद्यविक्रेता संघटनेचे महारक्तदान शिबीर

## जिल्ह्यात दोन ठिकाणी आयोजन, २ हजार बॉटल्सचे लक्ष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्हा मद्यविक्रेता संघटना आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्वातंत्र्यदिनी महारक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. थॅलेसेमिया, सिकलसेल निमिया, हिमोफिलिया आणि रक्ताचा कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना रक्ताची वारंवार गरज भासते. ही गरज पूर्ण करण्यासाठी २ हजार बॉटल रक्त संकलित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.




हे शिबिर जिल्ह्यात अमरावती शहर आणि धारणी अशा दोन ठिकाणी आयोजित केले जाईल. अमरावती शहरातील रक्तदान शिबिर कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रँड महफीलच्या रुबी हॉलमध्ये होईल. तर, धारणी येथील शिबिर उपजिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीच्या माध्यमातून योग्य ठिकाणी घेण्यात येणार आहे. मद्यविक्रेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक नितीन देशमुख यांनी ही माहिती दिली. दोन्ही शिबिरांमध्ये संघटनेचे पदाधिकारी, त्यांच्या आउटलेटमधील कर्मचारी आणि सामाजिक क्षेत्रातील तरुण सहभागी होणार आहेत.

दोन्ही शिबिरांची सुरुवात सकाळी ८ वाजता होईल. अमरावती येथील शिबिर मोठे असल्याने, येथे जिल्हा सामान्य रुग्णालय, पीडीएमएमसी आणि गोडे कॉलेजमधील रक्तपेढी तसेच बडनेरा येथील संत गाडगेबाबा रक्तपेढीचे अधिकारी-कर्मचारी सहकार्य करतील. याशिवाय, नागपूर येथील रेनबो रक्तपेढीचे अधिकारी-कर्मचारी देखील रक्त संकलनात सहभागी होणार आहेत.

या आयोजनावेळी नितीन देशमुख यांच्यासह संघटनेचे सचिव सचिन हिवसे आणि सागर भेटाळू, उपाध्यक्ष अनिल भामोरे, विजय जयस्वाल, सुरेश चांदवानी आणि दीपक गुडधे आदी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

# आरोग्य, स्वच्छता, मूलभूत सुविधेचे अधिकाऱ्यांना काम करण्याचे निर्देश

## आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांची शहरातील विविध ठिकाणी पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–** आरोग्य सेवा, स्वच्छता, बांधकाम तसेच नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या मूलभूत सुविधांबाबत तातडीने काम करण्याचे निर्देश मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. शहरातील विविध विकासकामे प्रत्यक्ष जागेवर जाऊन आयुक्तांनी मोदी हॉस्पिटल, बडनेरा येथील आठवडी बाजार तसेच चमननगर परिसराची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याची सुचनाही त्यांनी केली.आयुक्तांनी सर्वप्रथम मोदी हॉस्पिटल येथे भेट देऊन रुग्णालयाच्या विविध विभागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी दवाखान्यातील कार्यपद्धती, रुग्णांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची स्थिती, उपलब्ध औषधसाठा तसेच आवश्यक असलेल्या औषधांची माहिती



जाणून घेतली. तसेच दवाखान्यात उपलब्ध असलेल्या कर्मचारी वर्गाची माहिती घेऊन सध्याच्या कामकाजाच्या तुलनेत आणखी किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे, याबाबतही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. आरोग्य केंद्रामध्ये नागरिकांना वेळेत आणि आवश्यक त्या सुविधा मिळणे महत्त्वाचे असल्याचे सांगून उपलब्ध साधनसामग्री व मनुष्यबळाचा योग्य वापर करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध राहावा, आरोग्य सेवेमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये तसेच नागरिकांना समाधानकारक सेवा मिळावी, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले. अकोली वळण रस्ता चमननगर परिसराची पाहणी केली. अकोली वळण रस्ता चमननगर परिसरातून जात असल्याने या भागातील नागरिकांच्या सुविधा आणि नागरी समस्यांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. महानगरपालिकेच्या वतीने चमननगर येथील नागरिकांना देण्यात आलेल्या भूखंडांची आयुक्तांनी पाहणी केली. सदर ठिकाणी नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयी-सुविधांची उपलब्धता कितपत आहे, याची माहिती त्यांनी घेतली. या भागातील नागरिकांना दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेल्या रस्ते आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले.

# 'त्या' फ्लॅटवर भरोसा सेलचा छापा; नागपूरची तरुणी देहविक्रीच्या दलदलीतून मुक्त!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शहर पोलीस आयुक्तालयाच्या भरोसा सेलच्या महिला पथकाने सोमवारी दुपारी राजापेठ पोलिस ठाणे हद्दीतील टीटीनगर परिसरातील एका अपार्टमेंटमधील फ्लॅटवर धाड टाकून सुरू असलेल्या कुंटणखान्याचा पर्दाफाश केला. या कारवाईत नागपूर येथील एका पीडित तरुणीची देहविक्रीच्या दलदलीतून सुटका करण्यात आली असून, दोन ग्राहकांसह देहविक्रीचा व्यवसाय चालवणाऱ्या महिलेला ताब्यात घेण्यात आले.

भरोसा सेलच्या प्रमुख पोलिस निरीक्षक ज्योती विल्हेकर यांना टीटीनगरमधील एका फ्लॅटमध्ये नागपूरहून तरुणींना बोलावून अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीची खात्री पटवण्यासाठी पथकाने आधी बनावट ग्राहक तयार करून तिथे पाठवला. पंटरने खात्री पटवून इशारा देताच, दबा धरून बसलेल्या पोलिस पथकाने फ्लॅटवर अचानक धडक दिली. त्यावेळी तिथे दोन तरुण ग्राहक देखील रंगेहात आढळून आले.

ती महिला मागील चार वर्षांपासून याच फ्लॅटमध्ये हा अवैध व्यवसाय चालवत होती. विशेष म्हणजे, सुटका करण्यात आलेली पीडित महिला नागपूरची राहणारी असून ती नागपूर ते अमरावती असा नियमित प्रवास करून हा व्यवसाय करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या धडक कारवाईत पोलिस निरीक्षक ज्योती विल्हेकर यांच्यासह सहायक पोलिस निरीक्षक मेघाली गावंडे व पथकातील इतर महिला अंमलदारांनी सहभाग घेतला. आरोपींच्या जप्त करण्यात आलेल्या मोबाइल फोनमधून या रॅकेटचे अन्य कनेक्शन समोर येण्याची शक्यता असून, त्यातून तपासाला आणखी मोठी दिशा मिळेल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात पिटा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास राजापेठ पोलिसांकडे सोपवण्यात आला आहे.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून वकिलांसाठी ४० तासांचे प्रशिक्षणजिल्हयातील ४७ वकिलांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या वतीने वकिलांसाठी ७ ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ४० तासांचे मध्यस्थी प्रशिक्षण जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे सुरु आहे. अमरावती जिल्हयातील एकूण ४७ वकील प्रशिक्षण घेत असून त्याचा




फायदा पक्षकारांना व न्यायालयाला होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता प्रथमेश पोपट, न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बेलापुर, ठाणे सी. एन. ऑडरे यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थी वकिलांना मध्यस्थीचे ४० तासांचे सखोल प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष उदाहरणे, चर्चासत्रे, प्रश्नोत्तर सत्र, तसेच ध्यान, प्रत्यक्ष मध्यस्थी सत्र अनुकरणाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रशिक्षणात वकिलांना मध्यस्थी प्रक्रियेबाबत सैद्धांतिक तसेच व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. मध्यस्थीची संकल्पना व महत्त्व, मध्यस्थाची भूमिका व जबाबदार्या, पक्षकारांशी प्रभावी संवाद, वाटाघाटीची कौशल्ये, विवाद निराकरणाच्या विविध पद्धती, मध्यस्थीची प्रक्रिया तसेच मध्यस्थीतील व्यावहारिक बाबी याबाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

तत्पूर्वी, ७ ऑगस्ट रोजी या प्रशिक्षणाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष न्या. उज्वला एम. नंदेश्वर होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी केले. जिल्हा न्यायाधीश- १ ए. जी. जोशी,. अमरावती, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, के. आर. राजपुत, अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख आदी उपस्थिती होते.

# अमरावतीत मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात तेली समाज आक्रमक

## जरांगे पाटील यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती–** अमरावतीत मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात तेली समाज प्रचंड आक्रमक झाला आहे.. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात तेली समाजाने जरांगे पाटील यांच्या विरोधात निषेध आंदोलन केलं... अमरावतीचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विरोधात मनोज जरांगे पाटील यांनी अपमानास्पद आणि अश्लील जातीय स्वरूपाचं वक्तव्य केल्याचा आरोप तेली समाजाने केला आहे. त्यामुळे राज्यभरातील तेली समाजाच्या भावना दुखावल्या आहे त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करा अन्यथा राज्यभरात तेली समाज मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात आंदोलन करेल इशारा तेली समाजाने दिला



### मुख्यमंत्री फडणवीस व बावनकुळेंबाबत अपशब्द खपवून घेणार नाही– आ.प्रवीण पोटे पाटील

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री फड़णवीस आणि महसूल मंत्री बावनकुळे यांच्यावर केलेल्या टीकेनंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मनोज जरांगे यांनी वापरलेल्या आक्षेपार्ह भाषेचा आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेचा हा अपमान असून, अशी अपशब्द खपवून घेतले जाणार नाहीत, असा थेट इशारा आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी दिला आहे.मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आणि तरुणांना नियमानुसार जात प्रमाणपत्र तसेच न्याय 'मिळालाच पाहिजे, याला आमचा कोणताही विरोध नाही. शासन मराठा समाजाला न्याय देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे ही आ.प्रवीण पोटे पाटील म्हणालेत.

# फुटपाथवर दुकाने, फेरीवाल्यांचा थाट, पादचाऱ्यांची लागली वाट

## अमरावतीत पायवाटांवर दुकान, हॉटेल, चहा टपऱ्यांचा कब्जा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** जेथे कुठे रस्ता असेल तेथे पायी चालणाऱ्यांसाठी सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त जागा सुनिश्चित करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. मात्र, अमरावती शहरात या निर्देशांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील मुख्य आणि मोजक्याच रस्त्यांवर फुटपाथ निर्माण करण्यात आले, पण तिथे दुकाने, फेरीवाले,पारधी आणि अनधिकृत पार्किंगने ठिय्या मांडला आहे. परिणामी, पादचाऱ्यांना आपला जीव मुठीत धरून थेट रस्त्यावरूनच चालावे लागत असून नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.अमरावती शहराचा विस्तार वेगाने होत असला तरी नियोजनबद्ध फुटपाथची निर्मिती केवळ मुख्य रस्त्यांपर्यंतच मर्यादित आहे. शहरात आधीच मोजक्याच ठिकाणी फुटपाथ बांधण्यात आले आहेत. याही फुटपाथवर अतिक्रमण वाढले आहे हे



विशेष.

**व्यावसायिकच करतात जागेचा पूर्णपणे वापर**

सर्वसामान्य पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालण्यासाठी शहरात पुरेशी जागा उपलब्ध नाही. ज्या मोजक्या ठिकाणी फुटपाथ बांधले गेले आहेत, त्यावर स्थानिक दुकानदार, भाजी विक्रेते आणि टपरीधारकांनी मोठ्या प्रमाण अतिक्रमण केले आहे.

दुकानाचे सामान थेट फुटपाथवर मांडले जात असल्याने पादचाऱ्यांऐवजी व्यावसायिकच या जागेचा पूर्ण वापर करताना दिसतात.महानगर पालिका प्रशासन कारवाई करीत नसल्याने अतिक्रमणधारकांची हिम्मत वाढत चालली आहे.गांधी चौक ते राजकमल चौक त्यानंतर विलास नगर चौक, त्यानंतर सायंकाळी गर्ल हायस्कुल चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय,दस्तुर नगर ते यशोधा नगर या परिसरात पायदळ चालणार्यांची पूर्ण पणे वाट लागलेली असते.–

# राज्यातील १६ हजार शाळांना मिळणार साउंड सिस्टिम

## सूचना अन् शिक्षकांचा आवाज आता शेवटच्या बाकापर्यंत पोहोचणार

## २० कोटी ८० लाखांचा निधी मंजूरशाळेतील प्रार्थना

■ **अरुण जोशी** ■

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ अमरावती**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये ध्वनिक्षेपक संच अर्थात साउंड सिस्टिम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी तब्बल २० कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, राज्यातील सुमारे १६ हजार शाळांना त्याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे शाळांमधील दैनंदिन कामकाज, प्रार्थना, सूचना, अध्यापन तसेच विविध कार्यक्रमांसाठी ध्वनिव्यवस्था उपलब्ध होणार आहे.मोठ्या वर्गखोल्यांमध्ये किंवा विद्यार्थीसंख्या अधिक असलेल्या वर्गांमध्ये शिक्षकांचा आवाज शेवटच्या बाकावर बसलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत स्पष्टपणे पोहोचत नाही. ही अडचण दूर करण्यासाठी साउंड सिस्टिम उपयुक्त ठरणार आहे. शिक्षकांना अध्यापन करताना आवाज वाढविण्याची गरज कमी होईल आणि वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिकवलेले स्पष्टपणे ऐकता येणार आहे.प्रार्थना, सूचना आणि घोषणांसाठीही उपयोगशाळेतील सकाळच्या प्रार्थने दरम्यान सर्व विद्यार्थ्यांपर्यंत आवाज पोहोचविण्यासाठी या साउंड सिस्टिमचा वापर करता येणार आहे. तसेच महत्त्वाच्या सूचना, घोषणा किंवा शालेय उपक्रमांची माहिती एकाच वेळी संपूर्ण शाळेतील विद्यार्थ्यांना देता येईल.स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, गीतगायन, शाळेच्या सभा तसेच मार्गदर्शनपर कार्यक्रमांसाठीही ही ध्वनिव्यवस्था उपयोगी ठरणार आहे. शाळेच्या आवारात किंवा मोठ्या सभागृहात आयोजित कार्यक्रमांमध्येही विद्यार्थ्यांपर्यंत आवाज सहज पोहोचविता



येणार आहे.बाहेरून लाउडस्पीकर आणण्याची गरज कमी होणार आहे.शाळेतच साउंड सिस्टिम उपलब्ध असल्याने वारंवार होणारा ध्वनिव्यवस्थेचा खर्च वाचण्यास मदत होणार आहे.महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारितील शाळांना या सुविधेचा लाभ मिळणार आहे. शाळांमधील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे.

### १६ हजार शाळांना फायदा

राज्यातील सुमारे १६ हजार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी पीए सिस्टिम उपलब्ध करून देण्यासाठी २० कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे विशेषतः मोठ्या वर्गखोल्या आणि अधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या शाळांमध्ये अध्यापनासह विविध सामूहिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.–

# शेगावीच्या राणाची पालखी विदर्भात दाखल!

## हजारो भाविकाकडून जंगी स्वागत, १९ ऑगस्टला शेगावात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११शेगाव** बुलढाणा : मागील २९ जुलै रोजी पंढरपूर येथून शेगाव कडे परतीचा प्रवास सुरु करणारी शेगाव येथील गजानन महाराज संस्थानची पालखी मंगळवारी विदर्भात दाखल झाली. विठू नामाचा आणि संतांचा जयघोष करीत निघालेल्या या पालखीचे आणि त्यात सहभागी सातशेच्यावर वारकऱ्यांचे मराठवाडा व विदर्भाच्या सीमेवरील न्हावा या गावात येथे पारंपरिक पद्धतीने थाटात स्वागत करण्यात आले. त्यांनंतर जालना न्हावा सिंदखेड राजा या मार्गाने मार्गक्रमण करणारी ही पालखी आज बुधवारी राजमाता जिजाऊंच्या माहेरी अर्थात सिंदखेड राजात मुक्कामी आहे.



राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि हजारो भाविकांनी पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. यावेळी परिसरात गजानन भक्तांचा मेळा जमल्याचे दिसून आले. पोलिसांनी पालखी मार्गावर तगडा बंदोबस्त तैनात केला होता.

११ ऑगस्टला सिंदखेडराजा मुक्काम, १२ बिबी मुक्काम, १३ लोणार मुक्काम, १४ मेहकर मुक्काम, १५ ऑगस्ट जानेफळ मुक्काम, १६ शिर्ला नेमाने मुक्काम, १७ ला आवार मुक्काम, १८ ला खामगाव मुक्काम व १९ ला रोजी शेगाव येथे दाखल होणार आहे

### तब्बल तेराशे किमीचा प्रवास


श्रींच्या पालखी सोहळ्याचे हे ५७ वे वर्षे असून आपली पायदळ वारीची यशस्वी परंपरा संस्थान कायम ठेवून आहे. पंढरपूर ते शेगाव असा ५५० कि.मी. चा परतीचा प्रवास व शेगाव ते पंढरपूर असा जाण्या – येण्याचा १३०० कि.मी. या पायदळ प्रवास वारकरी पूर्ण करणार आहेत.

# 'हर घर तिरंगा' अभियानात अमरावतीकरांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा : आ. प्रविण पोटे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती–** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानात अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रविण पोटे पाटील यांनी केले आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवून राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना व्यक्त करावी, असे त्यांनी सांगितले.

'हर घर तिरंगा' हे अभियान केवळ घरावर राष्ट्रध्वज फडकविण्यापुरते मर्यादित नसून, देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची तसेच राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशाभिमानाची भावना अधिक दृढ करण्याची ही एक महत्त्वपूर्ण संधी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी म्हटले आहे.



जिल्ह्यातील प्रत्येक घरासोबतच शाळा, महाविद्यालये, शासकीय व निमशासकीय कार्यालये, विविध सामाजिक संस्था आणि संघटनांनीही या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा.

युवक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन 'हर घर तिरंगा' अभियानाला व्यापक स्वरूप द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

तिरंगा हा भारताच्या सार्वभौमत्वाचा, स्वाभिमानाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली प्रतीक आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने तिरंग्याचा सन्मान राखत राष्ट्रभक्तीची भावना मनामनात जागवावी आणि 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी होऊन देशाच्या गौरवात आपले योगदान द्यावे, असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

# राज्यात सर्व विद्यापीठांसाठी 'एकसमान शैक्षणिक वेळापत्रक'

## विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी कुलगुरूंनी संवाद साधावा– मंत्री चंद्रकांत पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांनी एकसमान शैक्षणिक वेळापत्रक लागू करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून हे वेळापत्रक लागू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करून एका आठवड्यात आवश्यक वेळापत्रक निश्चित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंची ऑनलाइन बैठक मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीत उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी आणि विविध समस्या थेट जाणून घेण्यासाठी प्रत्येक विद्यापीठाच्या कुलगुरूंनी



आठवड्यातून एक दिवस ५० विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. तसेच प्र–कुलगुरूंनीही ५० विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. या संवादातून समोर आलेल्या समस्या आणि त्यावरील उपाययोजनांचा अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.छएझच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांचे क्लस्टर निश्चित करून उपलब्ध मनुष्यबळ, प्रयोगशाळा, ग्रंथालये, पायाभूत सुविधा आणि इतर शैक्षणिक संसाधनांचे सामायिकरण वाढविण्यावर भर देण्यात आला. प्रत्येक विद्यापीठाने दर महिन्याला किमान एक क्लस्टर उपक्रम राबवावा, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.शैक्षणिक वर्ष २०२६–२७ आणि २०२७–२८ पासून चौथ्या वर्षाच्या ऑनर्स पदवी अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विविध विद्यापीठांनी तयार केलेल्या क्लस्टर अभ्यासक्रमांचा अभ्यास करून राज्यासाठी गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.परीक्षांमधील पेपरफुटीला आळा घालण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर मार्गदर्शक नियमावली (डजझ) तयार करण्याचे आदेशही देण्यात आले. पेपरफुटी रोखण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणारे परिपत्रक प्रसिद्ध करण्याच्या सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या.






सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व
राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला
आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :